RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ८, अंक १९(२)] गुरुवार, जुलै १४, २०२२/आषाढ २३, शके १९४४ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ४१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४.**—महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश . . . . . . . . . . . . | १-४ |

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ जुलै २०२२.

**MAHARASHTRA ORDINANCE No. IV OF 2022.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २०२२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४.**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

१९६५ चा महा. ४०.

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२२, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५१अ-१अ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ५१अ-१अ मधील, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— १९६५ चा महा. ४०.

"(१) कलम ५१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२२ याच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर, जिची सार्वत्रिक निवडणूक घ्यावयाची आहे अशा प्रत्येक नगर परिषदेचा, कलम ५१-१अ च्या तरतुदींस अधीन राहून, एक अध्यक्ष असेल, जो, कलम ११ अन्वये तयार केलेल्या नगरपारिषद मतदार यादीमध्ये ज्यांची नावे समाविष्ट केलेली आहेत अशा व्यक्तींद्वारे निवडण्यात येईल.". २०२२ चा महा. अध्या. ४.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याचे कलम ५१अ-१ब वगळणे.

**३.** मुख्य अधिनियमाचे कलम ५१अ-१ब वगळण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५१अ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५१अ मध्ये,-

(१) पोट-कलम (६अ) मधील, "महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१६ याच्या प्रारंभानंतर" या मजकुराऐवजी " महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२२ याच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर" हा मजकूर दाखल करण्यात येईल; २०१७ चा महा. ९. २०२२ चा महा. अध्या. ४.

(२) पोट-कलम (६ब) वगळण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५२ ऐवजी दाखल करणे.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५२ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

अध्यक्षाचा पदावधी.

"**५२.** अध्यक्षाचा पदावधी, त्याच्या निवडणुकीच्या दिनांकापासून पाच वर्षे इतका असेल आणि त्याची मुदत, परिषदेच्या मुदतीबरोबर समाप्त होईल :

परंतु, या कलमातील कोणतीही गोष्ट, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश,२०२२ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी जिची सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली आहे अशा परिषदेच्या बाबतीत, जो पद धारण करीत आहे अशा अध्यक्षास लागू असणार नाही आणि या कलमाच्या तरतुदी, अशा प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिनांकास त्या अस्तित्वात असल्याप्रमाणे, अशा अध्यक्षाच्या पदावधीच्या संबंधात नियमितपणे लागू असतील.". २०२२ चा महा. अध्या. ४.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३४१ब-१अ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४१ब-१अ मधील, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(१) कलम ३४१ब-१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२२ याच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर, जिची सार्वत्रिक निवडणूक घ्यावयाची आहे अशा प्रत्येक नगरपंचायतीचा, कलम ५१-१अ च्या तरतुदींस अधीन राहून, एक अध्यक्ष २०२२ चा महा. अध्या. ४.

असेल, जो, कलम ३४१ब अन्वये प्रत्येक प्रभागातून नगरपंचायतीच्या सदस्यांच्या निवडणुकांसाठी तयार केलेल्या मतदार यादीमध्ये ज्यांची नावे समाविष्ट केलेली आहेत अशा व्यक्तींद्वारे निवडण्यात येईल.”.

**७.** मुख्य अधिनियमाचे कलम ३४१ब-१ब वगळण्यात येतील. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याचे कलम ३४१ब-१ब वगळणे.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४१ब-२ मध्ये,- सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३४१ब-२ ची सुधारणा.

२०१८ चा महा. ८. (१) पोट-कलम (६अ) मधील, “ महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१७ याच्या प्रारंभानंतर ” या मजकुराऐवजी “महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२२ याच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर” हा मजकूर दाखल करण्यात येईल; २०२२ चा महा. अध्या. ४.

(२) पोट-कलम (६ब) आणि (६क) वगळण्यात येतील.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४१ब-४ मध्ये,- सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३४१ब-४ ची सुधारणा.

२०१८ चा महा. ८. (१) पोट-कलम (३) मधील, “ महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१७ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी ” या मजकुराऐवजी “महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२२ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी ” हा मजकूर दाखल करण्यात येईल; २०२२ चा महा. अध्या. ४.

(२) पोट-कलम (४) वगळण्यात येईल.

अचडणी दूर करण्याचा अधिकार. **१०.** (१) जर या अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या, मुख्य अधिनियमाच्या तरतुदी, अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरुप उद्‌भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

## निवेदन

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२० (२०२० चा महा. १२) याच्या प्रारंभानंतर, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) खालील नगरपरिषदांचे व नगर पंचायतींचे अध्यक्ष, नगरपरिषदांच्या व नगर पंचायतींच्या निवडून आलेल्या परिषद सदस्यांकडून निवडून दिले जातात आणि त्यांचा पदावधी, त्यांच्या निवडणुकांच्या दिनांकापासून अडीच वर्षे इतका आहे.

**२.** मोठ्या संख्येतील नगरपरिषदांच्या व नगर पंचायतींच्या निवडणुका, नियोजित आहेत आणि नजीकच्या काळात होण्याची शक्यता आहे. सद्यःस्थितीचा आढावा घेतल्यानंतर आणि नगरपरिषदांचे व नगर पंचायतींचे आणि उक्त पीठासीन प्राधिकाऱ्यांच्या पदांचे कामकाज सुरळीतपणे चालवण्याच्या दृष्टीने, उक्त अधिनियमाच्या तरतुदींमध्ये पुढीलप्रमाणे सुयोग्य सुधारणा करणे इष्ट वाटते :—

(एक) नगरपरिषदांच्या व नगर पंचायतींच्या निवडणुकांसाठी ज्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट आहेत अशा व्यक्तींद्वारे नगरपरिषदांच्या व नगर पंचायतींच्या अध्यक्षांची थेट निवड करण्यात येईल अशी तरतूद करणे ;

(दोन) नगरपरिषदेच्या व नगर पंचायतीच्या अध्यक्षाचा व उपाध्यक्षाचा पदावधी पाच वर्षांचा असेल अशी तरतूद करणे ;

(तीन) थेट निवडून आलेल्या अध्यक्षाला काढून टाकण्याची मागणी, त्याच्या निवडणुकीच्या तारखेपासून अडीच वर्षांच्या कालावधीत जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवली जाणार नाही अशी तरतूद करणे ;

(चार) आवश्यक असलेल्या इतर परिणामस्वरूप सुधारणा करणे.

**३.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ (१९६५ चा महा. ४०) यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १४ जुलै २०२२.

**भगत सिंह कोश्यारी,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सोनिया सेठी,**
शासनाच्या प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.